केवळ कार्यालयीन उपयोगासाठी

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्रांतील आदिवासी क्षेत्रांतील स्वयंसेवी संस्था त्यांची कार्ये आणि उद्दिष्टे एक समालोचन


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र राज्य

२८, राणीचा बाग, पुणे ४११००१.

१९८७

(71)

केवळ कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्रांतील आदिवासी क्षेत्रांतील स्वयंसेवी संस्था त्यांची कार्ये आणि उद्दिष्टे- एक समालोचन

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था [महाराष्ट्र राज्य]
२८, राणीचा बाग, पुणे-४११००१.
१९८७

# प्रस्तावना

देशांतील मागासवर्गीयांचे कल्याण करण्यासाठी घटनेनुसार केंद्र शासन कटिबध्द आहे. केंद्र शासनाचे गृह मंत्रालय अन्य विभागांचे मार्फत हा कार्यक्रम राबवित आहे. २०-कलमी कार्यक्रमांतर्गत समाजातील आजपावेतो दुर्लक्षित अशा दुर्बल घटकांचे सर्वांगीण विकासासाठी व त्यांचेसाठी वैयक्तीक आणि कौटुंबिक लाभाच्या योजना नियोजनबध्द आणि कालबध्द कार्यक्रमाव्दारे राबविण्याचा प्रयत्न देशाच्या पंचवार्षिक योजनांव्दारे होत आहे.

केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यांतील आदिवासी क्षेत्र आणि समाज यांचेसाठी उपरोक्त कार्यक्रम राबविण्यांत येत आहे. आदिवासी समाजासाठी एकत्रित विकासाच्या विविध स्वरूपाच्या योजना राबवून त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक पातळीवर उन्नती आणि विकास करणे आणि त्यांना दारिद्र्य रेषेच्यावर आणून स्वावलंबी करणे हा या मागचा प्रधान हेतू आहे.

वर उल्लेख करण्यांत आलेला सामूहिक विकासाचा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी एकट्या शासनाचे प्रयत्न पुरेसे होणार नाहीत. आदिवासी समाजांत त्यांचे उन्नतीसाठी सेवाभावी स्वयंसेवी संस्था आज सुमारे पन्नास वर्षांपासून महाराष्ट्रात कार्यरत आहेत. आदिवासी समाजाचे सर्वांगीण उन्नतीसाठी कार्यक्रम करण्याची स्वयंसेवी संस्थांची राज्यात फार मोठी परंपरा आहे. जनजागृती आणि समाजोध्दार या दोन महत्वाच्या गोष्टींव्दारे त्यांनी आदिवासी समाजाशी जवळीक साधली आहे. सामाजिक बांधिलकी आणि निस्वार्थी व तळमळीच्या कार्यकर्त्यांमुळे स्वयंसेवी संस्थांनी त्यांचे कार्याचा आकार राज्यांत घालून दिला आहे. काळाबरोबर बदलत्या समाजरचनेचे योग्य ते बदल ध्यानांत घेऊन या संस्था कार्य करीत आहेत.

आदिवासी समाजासाठी स्वयंसेवी संस्थांनी अशा प्रकारच्या चालविलेल्या कामाचे अनन्य साधारण महत्व जाणून समाजबांधणी आणि विकासासाठी त्यांचा कसा व्यापक स्वरूपांत उपयोग करून घेता येईल यासाठी राज्य/केंद्र शासन प्रयत्नशील आहे. शासन आणि शासक यांचेमधील एक दुवा म्हणून या स्वयंसेवी संस्था महत्वाची भूमिका बजावीत आहेत.

प्रस्तुत अहवालात महाराष्ट्रात आदिवासी समाजांत कार्य करणाऱ्या सेवाभावी स्वयंसेवी संस्था, त्यांची कार्ये व उद्दिष्टे इत्यादींचा उहापोह प्राप्त माहितीनुसार करण्याचा प्रयत्न केला आहे. हा अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेतील श्री. सु. मु. कुलकर्णी, संशोधन सहाय्यक यांनी माझे मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. आदिवासी विकासाशी संबंधित असणाऱ्यांना हा मार्गदर्शक अहवाल उपयुक्त ठरावा अशी माझी प्रामाणिक आशा आहे.

पुणे-१.

[डॉ. गोविंद गारे]
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

अनुक्रमणिका


| अ. क्र. | | विषय | पृष्ठक्रमांक | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १ | | २ | ३ | ४ |
| १. | प्रकरण–१ | प्रास्ताविक | १ | २ |
| २. | प्रकरण–२ | स्वयंसेवी संस्था उद्दिष्टे व कार्य | ३ | ५ |
| ३. | प्रकरण–३ | राज्यातील मान्यवर स्वयंसेवी संस्थांची यादी. | ८ | २६ |
| ४. | प्रकरण–४ | स्वयंसेवी संस्थांचे कार्य निष्कर्ष व शिफारसी | २७ | ३० |
| ५. | परिशिष्ट–१ | स्वयंसेवी संघटनांचे स्थान आणि कार्य | ३१ | ३९ |
| ६. | परिशिष्ट–२ | Voluntary Agencies in Tribal Areas : Their roles and functional types. | ४० | ४८ |

## प्रकरण-१

## प्रास्ताविक

१.१ महाराष्ट्र राज्यांत आदिवासींच्या सर्वांगीण विकास आणि उन्नतीसाठी शासन पातळीवरुन विविध माध्यमांव्दारे विकासाचे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. शासनाच्या या सर्वांगीण विकासाच्या कार्यक्रमांव्दारे आदिवासी समाजाची, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नती करुन त्यांना दारिद्र्य रेषेवर आणण्याचे दृष्टीने हे सर्व विकासाचे कार्यक्रम राबविण्यांत येत आहेत. आदिवासी समाजामध्ये आढळून येत असलेली शिक्षणाविषयीची उदासीनता, त्यांचे अज्ञान, अंधश्रध्दा आणि अत्यंत गरीबीची हलाखीची परिस्थिती लक्षांत घेऊन त्यांना स्वत:चे पायावर उभे कसे राहता येईल याचा विचार करुन या सर्व विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यांत येत आहे. केंद्र शासनाने पुरस्कृत केलेल्या २० कलमी कार्यक्रमाचा एक भाग म्हणून या विकास योजनांची अंमलबजावणी करण्यांत येत आहे. शासनाच्या [केंद्र/राज्य] या सर्वांगीण विकासाच्या योजना शासनाच्या विविध थरांतून आदिवासींपर्यंत यशस्वीपणे कशा पोचविल्या जातील यावरच या योजनांचे यश अवलंबून आहे. शासन आपल्या परीने या योजना आदिवासी समाजांतील खालच्या स्तरावर असणा-या लोकांपर्यंत पोचविण्यासाठी कार्यरत आहे. तथापि केवळ शासनाचे प्रयत्नांव्दारे आदिवासींच्या सर्वांगीण उन्नतीचे आणि विकासाचे कार्य पूर्ण होण्यासारखे नाही. त्याकरिता ज्या आदिवासींच्या विकासाकरिता हे सर्व कार्यक्रम राबविले जात आहेत त्या सर्व आदिवासी समाजाचा सहयोग आणि सहकार्य या कार्यक्रमांतून होणे आवश्यक आहे. यासाठी संपूर्ण आदिवासी समाजामध्ये या कार्यक्रमांविषयी जागृती आणि आपुलकीची भावना निर्माण होण्याची गरज आहे. या गोष्टीचे महत्व लक्षांत घेऊन आदिवासी समाज आणि त्यासाठी सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून सेवाभावी विचाराने कार्य करणा-या संस्थांची त्यासाठी मदत होणे अपरिहार्य आहे. सेवाभावी वृत्तीने काम करणा-या स्वयंसेवी संस्था या आदिवासींमध्ये शासनामार्फत त्यांचेसाठी राबविण्यांत येणा-या विकास कार्यक्रमांची आदिवासी बांधवांना

माहिती करुन देतील आणि त्यांचेमार्फत आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्याच्या शासनाच्या सर्वंकष प्रयत्नांना यशस्वीपणे कसा हातभार लावता येईल याकरिता त्यांचे सर्वतोपरी सहकार्य होण्याची नितांत गरज आहे. शासन आणि स्वयंसेवी संस्था यांनी परस्पर सहकार्य आणि सामंजस्याच्या भावनेने आदिवासी समाजासाठी एकत्रितपणे काम केल्यास आदिवासी समाजाचे विकास आणि उन्नती या दोन्ही गोष्टी यशस्वीपणे साध्य होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

....

## प्रकरण–२

## स्वयंसेवी संस्था– उद्दिष्टे व कार्य

२.१ शासनाच्या पंचवार्षिक योजनांच्याव्दारे विविध विकास कार्यक्रम आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकास आणि उन्नतीसाठी राबविण्यांत येत आहेत. एकट्या शासनाच्या प्रयत्नांनी या विकास कार्यक्रमांना आवश्यक ती गती आणि यश येणार नाही हे जाणून या विकास कार्यक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संपूर्ण आदिवासी समाजाच्या जागृतीसाठी कार्यरत असणा–या स्वयंसेवी संघटनांचे सहकार्य घेण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. आदिवासी समाज आणि संपूर्ण आदिवासी क्षेत्राच्या विकासासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्याच्या गोष्टीला शासन अतोनात महत्व देत आहे. सर्वसाधारणपणे आश्रमशाळा, मुला–मुलींसाठी वसतिगृहे आणि कांही प्राथमिक व माध्यमिक शाळा स्वयंसेवी संस्थांमार्फत आदिवासींकरिता चालविण्यांत येत आहेत. कांही स्वयंसेवी संस्थांमार्फत आदिवासींकरिता जंगल कामगार सहकारी संस्था सुरू करण्यांत आल्या आहेत. अनुसूचित क्षेत्रांतील गरजू लोकांसाठी वैद्यकीय सेवाही कांही स्वयंसेवी संस्थांनी उपलब्ध करून दिल्या आहेत.

२.२ स्वयंसेवी संस्थांनी आदिवासी बांधवांसाठी केलेल्या कामाचे व्यापक स्वरूप लक्षांत घ्यावयाचे दृष्टीने यासाठी महाराष्ट्रांत काम करणा–या कांही महत्वाच्या स्वयंसेवी संस्थांची नांवे पुढीलप्रमाणे सांगता येतील :–

१. डांग सेवा मंडळ, नाशिक.
२. बाल शिक्षा केंद्र, कोसबाड [जि. ठाणे]
३. गोखले एज्युकेशन संस्थेचे कृषि संशोधन केंद्र, कोसबाड [जि. ठाणे]
४. ठाणे जिल्हा आदिवासी समाजोन्नती संघ, गंजाड [जि. ठाणे]
५. कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ, पाली [जि. रायगड]
६. सातपुडा सर्वोदय मंडळ, धडगांव [जि. धुळे]
७. आदिवासी समिती, नाशिक
८. महाराष्ट्र आरोग्य मंडळ, पुणे.
९. सत्यनिकेतन सर्वोदय संस्था, राजूर [जि. अहमदनगर]
१०. वनवासी कल्याण आश्रम, मुंबई.

११. लोक बिरादरी प्रकल्प, हेमलकसा [जि. गडचिरोली]

१२. भूमीसेना [जि. ठाणे]

१३. आदिवासी सेवा मंडळ, ठाणे.

१४. शासकीय सहकारी संस्था, जळगांव

१५. ठाणे जिल्हा जंगल कामगार सहकारी संस्थांचे फेडरेशन, पालघर, जिल्हा–ठाणे.

१६. आदिवासी सेवा मंडळ, मुंबई.

१७. सेवाधाम ट्रस्ट, पुणे.

१८. ग्रामायन, पुणे.

१९. महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ, नाशिक.

२०. गाडगे महाराज मिशन, मुंबई.

२१. डेअरी सेवा मंडळ, नाशिक.

२२. भानसाळी ग्राम सेवा मंडळ, टाकळी [जि. नागपूर]

२३. कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक समिती, अमरावती.

२४. आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ, यवतमाळ

२५. पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळ, नंदुरबार [जि. धुळे]

२६. धर्मराव शिक्षण प्रसारक मंडळ, अहेरी [गडचिरोली]

२७. अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ, मोझरी, अमरावती.

२८. आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर, जि. पुणे.

२९. वनवासी कल्याण आश्रम, मुंबई.

३०. विश्व हिंदू परिषद

३१. आदिवासी जनजागृती केंद्र, पुणे.

३२. श्रमिक संघटना शहादा, जि. धुळे.

३३. कष्टकरी संघटना, ठाणे.

वर उल्लेख केलेल्या महत्वाच्या स्वयंसेवी संस्थांव्यतिरिक्त अन्य स्वयंसेवी संस्थाही राज्याच्या विविध आदिवासी भागांत समाजोपयोगी कार्य करीत आहेत.

२.३ शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी समाजाच्या विकासाचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना त्यांचे कामकाज चालविण्याचे दृष्टीने त्यांचे वार्षिक खर्चाच्या सुमारे ७५% ते १००% एवढे अनुदान शासनामार्फत देण्यांत येते.

२.४ आदिवासी समाजासाठी विकास कार्यक्रमाच्या ज्या विविध योजना स्वयंसेवी संस्थांचेमार्फत राबविण्यात येतात त्यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक आणि सामाजिक गोष्टींचा समावेश असल्याचे आढळून येते. महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या कार्यक्षेत्राचा आढावा घेतला असता विकास कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने पुढील बाबींवर जास्त प्रमाणात लक्ष केंद्रीत केले असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते :-

१] कृषि सेवा
२] वैद्यकीय आणि आरोग्य सेवा
३] दुग्ध व्यवसाय विकास
४] औद्योगिक सेवा
५] शिक्षण
६] सामाजिक सेवा, घरबांधणी
७] जनजागृति, जनजागरण, लोकसंघटन

२.५ वर नमूद केलेल्या कांही सेवांचे बाबतीत कार्याचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे देता येईल :-

१] <u>शिक्षण</u>-

१. प्राथमिक व पोस्टबेसिक आश्रमशाळा चालविणे.
२. प्रौढ शिक्षण कार्यक्रम
३. माध्यमिक शाळा, वसतिगृहे
४. आंगणवाडी, बालवाडी

२] <u>सामाजिक सेवा</u>-

१. आदिवासींकरिता आर्थिक विकासाचे कार्यक्रम.
२. सामाजिक सुधारणा
अ] विषमता निर्मूलन
ब] दारूबंदी
क] सामुहिक विवाह
ड] कुटुंब कल्याण
ई] स्त्री जागृति

२.६ राज्यामध्ये स्वयंसेवी संस्थामार्फत एकूण सुमारे ४०० आश्रमशाळा, अनुदानित वसतिगृहे आणि काही प्राथमिक व माध्यमिक शाळा चालविण्यात येत आहेत. कांही स्वयंसेवी संस्थांमार्फत दुर्गम अशा आदिवासी भागांत गरजू लोकांसाठी वैद्यकीय सेवासुध्दा उपलब्ध करून देण्यांत आली आहे. स्वयंसेवी संस्थांमार्फत राज्यांतील विविध आदिवासी क्षेत्रात राबविल्या जाणा-या योजनांचा फायदा तेथील आदिवासी लोक घेत असल्याचे आढळून आले आहे.

२.७ ग्रामीण विकासांतर्गत आदिवासी क्षेत्र आणि त्यामध्ये आढळून येणारे आदिवासी लोक यांचे विकासासाठी सेवाभावी वृत्तीने कार्य करणा-या स्वयंसेवी संस्था यांच्या कार्याचा आढावा घेतला असता पुढील बाबींचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल–

१. आदिवासी समाजांतील लोकांमध्ये त्यांचे विकासासाठी शासनामार्फत राबविण्यांत येणा-या कार्यक्रमाविषयी जागृती निर्माण करून प्रत्यक्ष योजनांमध्ये त्यांचा सहयोग घेण्याचे दृष्टीने प्रयत्न करणे आणि त्यासाठी योग्य ते नेतृत्व त्यांचेमध्ये निर्माण करणे, यासाठी योग्य ते प्रयत्न स्वयंसेवी संस्थांचे मार्फत हाती घेण्यांत येतात. यासाठी लागणारे कुशल नेतृत्व आणि उच्च क्षमतेची पात्रता असणारे निष्ठावंत कार्यकर्त्यांची फळी स्वयंसेवी संस्थांचे मार्फत उभी करता येते.

२. आदिवासी समाजामध्ये त्यांचेसाठी राबविण्यांत येणा-या विकास कार्यक्रमाबाबत त्यांना योग्य ती जाणीव करून देऊन त्या विषयी ठाम विश्वास निर्माण करणे आणि याव्दारे शासन आणि आदिवासी समाज यामध्ये योग्य तो सुसंवाद घडवून आणण्याचे व जनजागृती निर्माण करण्याचे काम स्वयंसेवी संस्थांचे मार्फत करण्यांत येते.

३. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकास आणि उन्नतीचे दृष्टीने केवळ शासनाच्या मदतीकडे न पहाता आपले स्वत:चे विकास कार्यक्रमासाठी परस्पर सहकार्य व सहयोग या भावनांची जाणीव व जपणूक केल्याखेरीज शासनाचे प्रयत्नांना योजलेले यश लाभणार नाही याची जाणीव करून देण्याचे महत्कार्य स्वयंसेवी संस्थांचेव्दारे करण्यांत येते. स्वत:चा विकास केल्याखेरीज सर्व समाजाचा विकास अशक्य आहे आणि सर्व समाजाचा

विकास म्हणजेच पर्यायाने शेवटी राष्ट्राचा विकास होय ही राष्ट्रीय एकात्मतेची भावना आदिवासी समाजामध्ये राबविण्याचे कार्य स्वयंसेवी संस्थांमार्फत करण्यांत येते. याकरिता स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्त्यांना त्यांचेबरोबर खेडयांतच वास्तव्य करावे लागते.

४. आदिवासी समाजांतील लाभार्थी आणि त्यांचे विकासासाठी प्रयत्नशील असणारे शासन यांचेमधील एक यशस्वी दुवा म्हणून स्वयंसेवी संस्था निश्चितच भूषणास्पद काम करु शकतात. याव्दारे शासनाला त्यांचे उद्दिष्ट प्रभावीपणे व यशस्वीपणे गाठण्यास हातभार लागू शकेल.

५. स्वयंसेवी संस्थांमध्ये मूलत: आदर्शवादी आणि माणुसकीची भावना असणारे सेवाभावी कार्यकर्ते असण्याची गरज आहे.

६. स्वयंसेवी संस्था त्यांच्या नि:स्वार्थी, सेवाभावी वृत्तीमुळे आणि त्यांचेकडील तळमळीच्या कार्यकर्त्यांचेव्दारे आदिवासी समाज आणि शासन यांचेवर आपला योग्य तो ठसा यशस्वी कामाचेव्दारे निर्माण करु शकतात.

२.८ समाजाच्या विकास कार्यक्रमामध्ये आर्थिक कार्यक्रमांचा फार मोठा हिस्सा आहे. आर्थिकदृष्टया विकासाचे कार्यक्रम ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे मूल्यमापन संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टीने केल्यानंतरच समाजाच्या विकास कार्यक्रमांच्या यश-अपयशाबद्दल कल्पना येऊ शकेल. गुणात्मकरीत्या कार्यक्रमांमध्ये सामाजिकदृष्टया होणा-या विकास कार्यक्रमांचा समावेश होतो. आदिवासी समाजाची सर्वांगीण उन्नती आणि विकास होण्याचे दृष्टीने संपूर्ण समाजाच्या भूतकालीन, वर्तमान आणि भाविष्यकालीन प्रवृत्तींचा एकत्रितपणे विचार संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टीने करुन त्या दृष्टीने कार्यक्रमांची अंमलबजावणी स्वयंसेवी संस्थांमार्फत होणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या एकत्रित समाजाच्या उन्नतीचा विचार करतांना स्वयंसेवी संस्थांनी त्यांचे कार्यक्रमांत आर्थिक, वैद्यकीय तथा पोषण आणि शैक्षणिक कार्यक्रमांचा अंमलबजावणीचे दृष्टीकोनांतून अंतर्भाव करणे अगत्याचे आहे. आदिवासी समाजाची जनजागृती करुन त्यांची संघटनात्मक बांधणी करणे, त्यांना त्यांचेसाठीच्या विकास कार्यक्रमांची जाणीव करुन देणे या गोष्टींवर प्रामुख्याने भर देण्यांत यावा. या सर्व गोष्टी केवळ शासन स्तरावर होणे अशक्य असल्यामुळे स्वयंसेवी संस्था आणि शासन यांचे संयुक्त प्रयत्नाव्दारे त्यांची अंमलबजावणी करणे सोयीचे आणि सोपे जाईल. याकरिता प्रामाणिक व तळमळीने कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांची मदत घेणे हे अपरिहार्य आहे आणि ती आजच्या समाजरचनेत काळाची गरज आहे.

## प्रकरण- ३

### राज्यांतील मान्यवर स्वयंसेवी संस्थांची यादी

३.१ आदिवासी समाजातील अत्यंत दुर्बल अशा घटकांसाठी शासनामार्फत विविध माध्यमांव्दारे जे विकासाचे कार्यक्रम राबविण्यांत येत आहेत त्यांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सध्या समाजामध्ये कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य व सहयोग होणे हे अपरिहार्य आहे. एवढेच नव्हेतर ज्या ठिकाणी शासनाचे प्रयत्न पोहोचू शकत नाहीत त्याठिकाणी स्वयंसेवी संस्था त्यांनी आजतागायत केलेल्या त्यांचे परंपरागत कामामुळे यशस्वी झालेल्या दिसतात. घटनात्मकदृष्टया अशासकीय असल्यामुळे त्यांना त्यांचे कार्यक्रमामध्ये पूर्णपणे स्वातंत्र्य मिळू शकते. आदिवासी समाजामध्ये त्यांनी केलेले काम, त्यांचेबद्दल निर्माण केलेला विश्वास आणि अशा प्रकारच्या स्वयंसेवी संस्थामध्ये निस्वार्थी व सेवाभावी वृत्तीने काम करणा-या कार्यकर्त्यांची उपस्थिती या सर्वांचा एकत्रितपणे परिणाम होऊन या सेवाभावी संस्था विषयी आदिवासी समाजाला त्यांचेविषयी अपार आपुलकी वाटते. स्वयंसेवी संस्था त्यांचे कार्य सामाजिक बांधिलकीच्या तत्वावर चालत असल्यामुळे समाजामध्ये आवश्यक ते परिवर्तन घडवून आणून समाज संघटनाचे कार्यसुध्दा त्यांचेकडून होत असते. वैयक्तीक आदिवासींचा विकास व त्यामुळे संपूर्ण समाजाचा विकास व याव्दारे संपूर्ण राष्ट्राचा विकास या राष्ट्रीय एकात्मिकतेच्या दृष्टीने महत्वपूर्ण अशा भावनेवर त्यांचे कार्य चालते.

३.२ अशाप्रकारे विकास कार्यक्रमाचे सूत्र संचालन व अंमलबजावणी स्वयंसेवी संस्थांमार्फत आदिवासी समाजांत होत आहे. महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रांतील व समाजांतील भागांत काम करणा-या स्वयंसेवी संस्थांची संख्या फार मोठी आहे. तरीसुध्दा कांही महत्वपूर्ण स्वयंसेवी संस्थांची माहिती गोळा करून पाहिले असतां, अशा मोठया मान्यवर संस्थांची एकूण संख्या १४१ आहे. सदर मान्यवर संस्थांची जिल्हा निहाय यादी पुढे दिली आहे.

तक्ता- ३.२.१

आदिवासी क्षेत्रासाठी व क्षेत्रांत काम करणा-या स्वयंस्फूर्त संस्थांची महाराष्ट्र राज्यातील जिल्हा निहाय यादी :-

[१] मुंबई :-

१] श्री. कांचनभाई पटेल [सेक्रेटरी]
आदिवासी सेवा मंडळ,
६, वीर नरीमन रोड, मुंबई.

२] श्री. वसंतराव काणे [प्रांत सचिव]
वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र,
व्दारा- श्री. रामकृष्ण चिकित्सालय,
२६७ अ, संघवी मॅन्शन, जगन्नाथ शंकरशेठ रोड,
गिरगांव, मुंबई-४००००४.

३] डॉ. एल. एन. गोडबोले [सचिव]
आदिवासी उन्नती मंडळ,
व्दारा- किर्ती वर्क्स [टॅब्लेटस्]
९८, टी. एच. कटारिया मार्ग, माहिम,
मुंबई-४०००१६.

४] श्री. जी. जी. भांगरे [चिटणीस]
आदिवासी सेवा मंडळ, मुलुंड [मुंबई-८०]
अपना बाजार समोर, जवाहरलाल नेहरु रोड,
मुलुंड, मुंबई-४०००८०.

५] श्री. दामोदर झळपाते [सरचिटणीस]
आदिवासी महामंडळ,
"गिरीकुंज" ब्लॉक नं. अ/५,
आदिवासी गृह निर्माण सहकारी सोसायटी मर्या.
लिंकिंग रोड, एक्स्टेंशन एच. एल. सी. बँक,
सांताक्रूज [प.] मुंबई-४०००५४.

६] डॉ. के. आर. तोरस्कर [कार्यवाह]
उल्हास परिसर प्रतिष्ठान,
फत्ते मॅन्शन, ९८ शेठ मोती शाह लेन,
माझगांव, मुंबई-४०००१०.

७] श्री. आर. एल. शिरसेकर [कार्यालय अधिक्षक]
श्री. गाडगे महाराज मिशन,
६, विद्यार्थी भुवन, त्रिभूवन रोड,
मुंबई-४००००४.

८] श्री. मुकुंद गोंधळेकर [कार्यवाह]
"राजमाची ग्राम सहाय्य योजना"
एल/५४, रिझर्व्ह बँक ऑफ क्वार्टर्स,
मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल,
मुंबई-४००००८.

९] श्री. किशोर व. देशपांडे [अध्यक्ष]
वन निकेतन,
डी-२०, जमुना मिथा चौकी,
मालाड [पश्चिम]
मुंबई-४०००६४.

१०] डिप्रेस्ड क्लास मिशन सोसायटी,
मुंबई.

११] हरिजन सेवक संघ,
मुंबई.

[२] <u>ठाणे</u>-

१] श्री. म. गो. कडू [अध्यक्ष]
ठाणे जिल्हा आदिवासी समाज उन्नती संघ,
मु. पो. कासा, व्हाया-डहाणू रोड,
तालुका-डहाणू, जिल्हा-ठाणे.

२] श्रीमती अनुताई वाघ [अध्यक्ष]
ग्राम बाल शिक्षा केंद्र,
कोसबाड, तालुका-डहाणू, जि. ठाणे.

३] श्री. ल. शि. कोम, [अध्यक्ष]
आदिवासी प्रगती मंडळ,
तलासरी, तालुका-तलासरी,
जिल्हा-ठाणे.

४] श्री जीवन सोमा-या शेलार [अध्यक्ष]
"भूमिसेना", मु. पो. मनोर,
तालुका-पालघर, जिल्हा-ठाणे.

५] श्री. काळूराम धांगडा [अध्यक्ष]
"कष्टकरी संघटना",
मु. शिसने, पो. धुंदलवाडी,
तालुका-डहाणू, जिल्हा-ठाणे.

६] श्री. देवराज के. शाह [अध्यक्ष]
जीवन विकास शिक्षण संस्था,
पालघर, हिराभवन, मु.पो.ता. पालघर,
जिल्हा–ठाणे–४०१४०४.

७] श्री. माधव काणे [संचालक]
"विश्व हिंदू परिषद" तलासरी,
मु.पो.ता. तलासरी,
जिल्हा–ठाणे–४२१६०६.

८] श्री. वसंत रघुनाथ पटवर्धन [कार्याध्यक्ष]
प्रगति प्रतिष्ठान, जीवन चर्या, राम मारुती रोड,
नवापाडा, ठाणे–४००६०२.

९] श्री. विजय साठे [कार्याध्यक्ष]
श्रमिक मुक्ती संघटना,
मु.पो.ता. मुरबाड [ताडआळी]
जिल्हा–ठाणे.

१०] श्री. अ.गु. देशमुख [अध्यक्ष]
श्री. गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा,
भातसई [वासिंद] तालुका–शहापूर, जि. ठाणे.

११] श्री. ए.डब्ल्यू. परेरा [अध्यक्ष]
"महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ,"
वसई शाखा, ता. वसई, जि. ठाणे.

१२] श्री. एस.पी. कुलकर्णी [सचिव]
शिक्षक संचालीत शिक्षण संस्था,
वाडा, मु.पो.ता. वाडा, जिल्हा–ठाणे.

१३] भारतीय समाज उन्नती मंडळ,
"उषाकिरण" विद्याश्रम भिवंडी,
मु.पो.ता. भिवंडी, जिल्हा–ठाणे–४२१३०५.

१४] संचालक,
सहयाद्री आदिवासी बहुविध सेवा संघ,
मु. देवबांध, पो. खोंडाळा, तालुका–मोखाडा,
जिल्हा–ठाणे.

१५] अध्यक्ष,
आदिवासी जाणीव जागृती केंद्र,
मु. वाकळवाडी सुटळ, पो. मोरोशी,
तालुका–मुरबाड, जिल्हा–ठाणे.

१६] अध्यक्ष,
"जंगल कामगार संघ,
मु. पो. तालुका-शहापूर, जिल्हा-ठाणे.

१७] अध्यक्ष,
शांतीवन शेतकरी सेवा मंडळ,
पो. आशागड, व्हाया-डहाणू रोड,
ता. डहाणू, जिल्हा-ठाणे.

१८] अध्यक्ष,
ठाणे जिल्हा सर्वोदय मंडळ,
मु. पो. तवा, तालुका-जव्हार,
जिल्हा-ठाणे.

१९] हरिजन गिरीजन उन्नती मंडळ,
भिवंडी, जिल्हा-ठाणे.

२०] गोखले शिक्षण संस्था,
कोसबाड, जिल्हा-ठाणे.

२१] वनगांव शिक्षण संस्था,
वनगांव, जिल्हा-ठाणे.

२२] आदिवासी ग्राम सेवा संघ,
कैनाड, जिल्हा-ठाणे.

२३] बालकंजी बारी आश्रम,
बापूगांव, तालुका-डहाणू,
जिल्हा-ठाणे.

२४] ज्ञानमाता सदन संस्था,
तलासरी, जिल्हा-ठाणे.

२५] शिक्षण प्रसारक मंडळ, कासा,
तालुका-डहाणू, जिल्हा-ठाणे.

२६] श्री. जयंत शामराव पाटील
प्राचार्य कृषि शिक्षण संस्था,
कोसबाड, जिल्हा-ठाणे.

[३] नाशिक :

१] श्री. दादासाहेब एस. बिडकर [अध्यक्ष]
डांगसेवा मंडळ, वैद्य बंगला,
शरणपूर रोड, नाशिक-४२२००२.

२] अध्यक्ष,
आदिवासी सेवा मंडळ, ४२७, धनगर लेन,
नाशिक रोड, नाशिक-४२२००१.

३] अध्यक्ष,
आदिवासी ग्राम विकास मंडळ,
आंबेपाडा, तालुका-सुरगणा,
जिल्हा-नाशिक.

४] श्री. प्रशांत हिरे [सचिव]
आदिवासी सेवा समिती, ४९८, आहेर अपार्टमेंट,
धनगर गल्ली, घारपुरे घाटलेन, अशोक
स्तंभाजवळ, नाशिक-४२२००२.

५] श्री. पंडितराव धर्माजी पाटील [अध्यक्ष]
नाशिक जिल्हा विधायक कार्य समिती,
सटाणा, तालुका-बागलाण, जिल्हा-नासिक.

६] महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ,
मु.पो. महाजे, ता. दिंडोरी,
जिल्हा-नासिक.

७] श्री. भाऊ वाघ [अध्यक्ष]
आदिवासी उन्नती मंडळ संचलित संस्था,
वैतरणानगर, तालुका-इगतपुरी,
जिल्हा-नाशिक.

८] डॉ. आचार्य, [अध्यक्ष]
वनवासी कल्याण आश्रम गुही,
पो. कुकडणे, तालुका-सुरगाणा,
जिल्हा-नाशिक-४२२२११.

९] श्री. दामोदर पांडू ठाकरे [अध्यक्ष]
डांग सौंदाणे विभाग आदिवासी जंगल कामगार
सहकारी सोसायटी मर्यादित, मु.पो.ता. सटाणा,
जिल्हा-नाशिक.

१०] श्री. अबाजी रा. खांबाईत [अध्यक्ष]
ग्रामविकास मंडळ, निरगुडे
पो. करंजाळी, तालुका-पेठ, जि. नासिक.

११] वनवासी कल्याण आश्रम,
सु. पो. गंगाम्हाळुंगी,
तालुका–त्र्यंबक,
जिल्हा–नासिक.

१२] जनता सेवा मंडळ, नासिक

१३] सर्वोदय शिक्षण संस्था,
वणी, जिल्हा–नासिक.

१४] नासिक जिल्हा शिक्षण विकास मंडळ
शरणपूर रोड, नासिक–२.

[४] धुळे :

१] श्री. प्रेमचंद आसाराम जाधव [अध्यक्ष]
सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ,
विद्यावाडी, धुळे–५, जिल्हा–धुळे.

२] श्री. जयसिंगराव नामदेवराव अहिरराव [अध्यक्ष]
साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी,
साक्री, तालुका–साक्री, जिल्हा–धुळे.

३] श्री. एस. सी. चव्हाण [अध्यक्ष]
चिंचपाडा विभाग, शिक्षण प्रसारक मंडळ,
सु. पो. चिंचपाडा, तालुका–नवापूर,
जिल्हा–धुळे–४२५४१८.

४] श्री. गो. स. मराठे [अध्यक्ष]
नंदुरबार तालुका विधायक समिती,
सु. पो. ता. नंदुरबार, तालुका–नंदुरबार,
जिल्हा–धुळे–४२५४१२

५] श्री. जनार्दन पोह–या वळवी [अध्यक्ष]
आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ,
धडगांव, तालुका–अक्राणी, जि. धुळे.

६] श्री. माणिकराव होडल्या गावीत,
खासदार [अध्यक्ष]
आदिवासी विकास मंडळ, खांडबारा,
तालुका–नवापूर, जिल्हा–धुळे–४२५४१८.

७] श्री. बकाराम तुकाराम कोकणी [अध्यक्ष]
आदिवासी विकास मंडळ, खांडबारा,
तालुका– नवापूर, जिल्हा–धुळे.

८] श्री. जे. एच. म्हस्कारेन्हास [चिटणीस]
जनसेवा मंडळ, कोरीट रोड, नंदुरबार,
ता. नंदुरबार, जिल्हा–धुळे–४२५४१२.

९] अध्यक्ष,
पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळ, नंदुरबार
तालुका–नंदुरबार, जिल्हा–धुळे–४२५४१२.

१०] अध्यक्ष,
किसान विद्या प्रसारक मंडळ, बोराडी,
तालुका– शिरपूर, जिल्हा–धुळे.

११] अध्यक्ष,
अक्कलकुवा, तळोदा, तालुका विधायक समिती,
तळोदा, ता. तळोदा, जिल्हा–धुळे–४२५४१३.

१२] अध्यक्ष,
साक्री तालुका आदिवासी सेवा मंडळ, पिंपळनेर,
तालुका–साक्री, जिल्हा–धुळे.

१३] १. श्री. बहारु सोनवणे [अध्यक्ष]/
२. श्रीमती रंजना कान्हेरे [अध्यक्षा]
श्रमिक संघटना, मोहिदे रोड, शहादा,
तालुका–शहादा, जिल्हा–धुळे–४२५४०९

१४] अध्यक्ष,
सातपुडा आदिवासी लोकसेवा मंडळ, शेजमोई
मु.पो. शेजमोई, तालुका–अक्कलकुवा,
जिल्हा–धुळे.

१५] अध्यक्ष,
वनवासी कल्याण आश्रम,
मु. कानडी, पो. चिखली,
तालुका–शहादा, जिल्हा–धुळे–४२५४०९.

१६] अध्यक्ष,
आदिवासी समाजकेंद्र, कुकडेल,
तालुका–शहादा, जिल्हा–धुळे–४२५४०९

१७] आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ,
शहादा, जिल्हा–धुळे.

१८] साने गुरूजी श्रमिक विद्यापीठ,
बोराडी, तालुका–शिरपूर,
जिल्हा–धुळे.

१९] सातपुडा सर्वोदय मंडळ,
धडगांव, जिल्हा–धुळे.

[५] <u>जळगांव</u> :

१] श्री. धनाजी नाना चौधरी [अध्यक्ष]
आदिवासी सेवा मंडळ, सत्रासेन,
तालुका– चोपडा, जिल्हा–जळगांव.

२] डॉ. सुरेश जी. पाटील [अध्यक्ष]
आदिवासी सेवा मंडळ, चोपडा,
तालुका–चोपडा, जिल्हा–जळगांव.

३] अध्यक्ष,
पाचोरा शिक्षण संस्था, पाचोरा,
तालुका– पाचोरा, जिल्हा–जळगांव.

४] अध्यक्ष,
सातपुडा विकास मंडळ, पाल,
तालुका–रावेर, जिल्हा–जळगांव.

५] अध्यक्ष,
जनता शिक्षण मंडळ, खिरोडा,
तालुका– खिरोडा, जिल्हा–जळगांव.

६] अध्यक्ष,
विद्या विकास मंदिर, सावदा,
तालुका– सावदा, जिल्हा–जळगांव.

[६] <u>पुणे</u>:

१] श्री. एस. व्ही. गोरे [अध्यक्ष]
"सेवाधाम ट्रस्ट"
व्दारा– मनोज क्लिनीक
११४८, सदाशिव पेठ, पुणे–४११०३०.

२] श्रीमती अनुसया लिमये [अध्यक्षा]
आदिवासी सहज शिक्षण परिवार [मासवण]
२५० के. शनिवार पेठ–३०.

३] श्री. शरद कुलकर्णी
संचालक,
आदिवासी जाणिव जागृती केंद्र,
३ शांतादुर्ग, ४१/५, कर्वे रोड,
एच. ए. सोसायटी जवळ, पुणे-३८.

४] सचिव,
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
६४, आनंद पार्क, औंध, पुणे-७.

५] श्री. रखमा गुणाजी सांगडे [अध्यक्ष]
आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर
तालुका- जुन्नर,
जिल्हा- पुणे.

६] डॉ. के. एस. दामोदर [अध्यक्ष]
ग्रामीण समाजसेवा संस्था, कडूस,
मु. पो. कडूस, ता. खेड, जिल्हा-पुणे.

७] श्रीमती गंगूताई पटवर्धन [अध्यक्षा]
नूतन बालशिक्षण संघ, पुणे शाखा,
"महिला निवास", इमारत, डेक्कन जिमखाना,
पुणे-४११००४.

८] श्री. अल्मगीर मुलाणी [अध्यक्ष]
गरीब डोंगरी संघटना,
द्वारा-राईस्कर, आंबराई कॅम्प,
८८४, डेक्कन जिमखाना, पुणे-४११००४,

९] अध्यक्ष,
गिरीजन विकास मंडळ,
मु. पो. वाडा,
ता. राजगुरुनगर,
जिल्हा- पुणे.

१०] अध्यक्ष,
आदिवासी शिक्षण संस्था,
मु. पो. निमगिरी, ता. जुन्नर, जि. पुणे.
व
ग्राम विकास मंडळ, निमगिरी, ता. जुन्नर.

११] आदिवासी जनविकास मंडळ,
सोनावळे, तालुका–जुन्नर, जि. पुणे.

१२] भीमाशंकर सेवा संघ, तळेघार,
तालुका– आंबेगांव, जिल्हा–पुणे.

१३] डेव्हलपमेंट ग्रुप "समाधान",
२०७१, विजयानगर कॉलनी, पुणे–३०.

[७] <u>अहमदनगर</u> :

१] श्री. एम. एम. भवारी [सचिव]
आदिवासी उन्नती सेवा मंडळ, राजूर,
तालुका–अकोले,
जिल्हा–अहमदनगर.

२] अध्यक्ष,
सत्यनिकेतन,
मु. पो. राजूर, तालुका–अकोले,
जिल्हा–अहमदनगर–४२२६०४.

३] अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,
अहमदनगर.

[८] <u>नांदेड</u> :

१] अध्यक्ष,
मराठवाडा भटक्या जाती समिती,
जुनागोंडा, तालुका–जुनागोंडा,
जिल्हा–नांदेड.

२] पुरोगामी मित्र मंडळ,
मु. पो. ता. मुखेड,
जि. नांदेड–४३१७१५.

३] आदिवासी सेवा संघ, किनवट,
जिल्हा– नांदेड.

[९] <u>अकोला</u> :

१] श्री. धिालू मातीग पाटील [अध्यक्ष]
आदिवासी कल्याण सेवा मंडळ,
मु. वत्सापूर, पो. रुइखेड,
तालुका– अकोट, जिल्हा–अकोला.

[१०] <u>यवतमाळ</u> :

१] अध्यक्ष,
पारवा शिक्षण संस्था, पारवा,
तालुका- दारव्हा, जिल्हा-यवतमाळ.

२] अध्यक्ष,
आदिवासी विकास शिक्षण प्रसारक मंडळ,
मु. पो. ता. जि. यवतमाळ.

३] डॉ. ल. ग. विधाने [सचिव]
दि जवाहर स्मृती शिक्षण समिती,
भार्की बु.
मु. पो. भार्की, ता. मालेगांव,
जि. यवतमाळ.

[११] <u>नागपूर</u> :

१] अध्यक्ष,
राष्ट्रीय आदिवासी विकास मंडळ,
वॉर्ड क्र. ५३, नागपूर-१७.

२] अध्यक्ष,
भारतीय आदिम जाती सेवक समाज,
मस्कासाथ इतवारी, नागपूर-४४०००२.

३] महाराष्ट्र प्रदेश आदिवासी सेवा समिती,
नागपूर.

[१२] <u>परभणी</u> :

१] अध्यक्ष,
मराठवाडा प्रदेश अनुसूचित जमाती,
विमुक्त जाती आणि बी. सी. सेवा संघ,
तालुका- जिल्हा-परभणी.

२] डॉ. एस. आर. पवार [सचिव]
संत नामदेव शिक्षण प्रसारक मंडळ,
जांभरून आंध तांडा, तालुका-हिंगोली,
जिल्हा- परभणी.

[१३] भंडारा :

१] श्री. रघुनाथजी मरसकोले [सचिव]
भारतीय आदिवासी शिव शिक्षण संस्था,
गराडा, तालुका-साकोली, जिल्हा-भंडारा.

२] अध्यक्ष,
राष्ट्रीय आदिवासी शिक्षण संस्था,
गिरोला, तालुका-साकोली, जिल्हा-भंडारा.

[१४] रत्नागिरी :

१] अध्यक्ष,
आदिवासी सेवा मंडळ,
दापोडी, तालुका- दापोली,
जिल्हा-रत्नागिरी.

२] अध्यक्ष,
गोपुरी आश्रम, वागदेव, रत्नागिरी
तालुका-जिल्हा-रत्नागिरी.

३] अध्यक्ष,
"देवांग" विठाकर सहकारी सोसायटी मर्यादित,
हारीपट्टम, तालुका-कनकवली,
जिल्हा-रत्नागिरी.

४] अध्यक्ष,
"कस्तुरबा केंद्र" मु. पो. आंबोरी,
तालुका- मालवण, जिल्हा-रत्नागिरी.

५] ग्राम सुधारक सेवा समिती,
पावस, जिल्हा-रत्नागिरी.

६] म. ज्योतिबा फुले संस्था,
रत्नागिरी.

[१५] चंद्रपूर :

१] डॉ. एस. जी. देवगावकर [अध्यक्ष]
आदिवासी संशोधन आणि विकास मंडळ,
वरोरा, तालुका-वरोरा,
जिल्हा-चंद्रपूर-४४२९१४.

२] अध्यक्ष,
आदिवासी शिक्षण संस्था,
मु. पो. ता. चिखली, जि. चंद्रपूर.

[१६] गडचिरोली :

१] श्री. टी. वी. किरंग [अध्यक्ष]
किरंग गुरुजी धानोरा,
व्दारा" श्री. आनंदराव गावडे, धानोरा,
मु. पो. ता. धानोरा.
गडचिरोली जिल्हा नवयुवक माडिया आदिवासी
समाज सुधारक तथा कला मंडळ, धानोरा,
तालुका-धानोरा, जिल्हा-गडचिरोली.

२] श्री. राजे विश्वेश्वर राव महाराज [अध्यक्ष]
धर्मराज शिक्षण मंडळ, अहेरी,
तालुका-अहेरी, जिल्हा-गडचिरोली.

३] श्री. प. पि. भापे [आश्रम सेवाधिकारी]
श्री. गुरुदेव आश्रमशाळा, कमलापूर,
तालुका- अहेरी, जिल्हा-गडचिरोली.

४] श्री. राजेंद्रसिंह ठाकूर [अध्यक्ष]
जागृत आदिवासी संघटना,
मु. पो. पुराडा, ता. कुरखेडा,
जिल्हा- गडचिरोली.

५] श्रीमती शशीला कोठारवार [अध्यक्षा]
जागृत आदिवासी संघटना,
मु. पो. अलापल्ली, एलगुर रोड,
तालुका- अहेरी, जिल्हा-गडचिरोली.

६] आदिवासी समाजसेवा शिक्षण संस्था,
डोंगरगांव, जिल्हा-गडचिरोली.

[१७] रायगड :

१] श्री. वसंतराव काणे [प्रांत सचिव]
वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र केंद्र,
शिरढोण, तालुका-पनवेल, जि. रायगड.

२] श्री. के. गो. लिमये [संचालक]
कुलाबा जिल्हा आदिवासी सेवामंडळ, पाली,
तालुका- सुधागड, जिल्हा-रायगड,
पिन कोड- ४१०२०५.

३] श्री. गोविंद का. शिंदे [कार्यवाह]
कुष्ठरोग निवारण समिती,
शांतीवन वाकडी, पो. नेरे,
तालुका- पनवेल, जिल्हा-रायगड.

४] श्री. दर्शन शंकर [अध्यक्ष]
अॅकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स,
मु. पो. करोळे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड.
पिन कोड- ४१०२०१.

५] श्रीमती सुरेखा दळवी [अध्यक्षा]
तारा प्रकल्प/श्रमिक क्रांती संघटना,
मु. तारा, पो. बारापाडा,
ता. जि. रायगड.

६] श्री. प्रमोद वसंत करंदीकर [अध्यक्ष]
वनवासी कल्याण आश्रम,
मु. वैजनाथ, पो. हुमगांव, ता. कर्जत,
जिल्हा- रायगड.

७] श्री. प्रदिप बबाजी गायकवाड [अध्यक्ष]
जागृत भाऊबंदी संघटना,
मु. भार्गाचीवाडी, पो. पाथरस,
ता. कर्जत, जि. रायगड.

८] हुतात्मा हिराजी पाटील,
शिक्षण प्रसारक मंडळ, पोई,
ता. कर्जत, जि. रायगड.

[१८] सोलापूर :

१] श्रीमती सरोजिनीबाई के. शहा [अध्यक्षा]
बाल संस्कार केंद्र, सोलापूर, लांबोटी,
तालुका- मोहोळ,
व्दारा- जिल्हा हरिजन सेवक संघ,
घाटी गल्ली, सोलापूर.

२] श्री. बाबुराव आर. पवार [अध्यक्ष]
पारधी समाजसेवा संघ,
२४४, साऊथ सदर बाजार, सोलापूर,
जिल्हा- सोलापूर.

[१९] वर्धा :

१] श्री. हंसराज हरिसिंग जाधव [अध्यक्ष]
बंजारा सेवा शिक्षण मंडळ, आर्वी,
तालुका– आर्वी, जिल्हा–वर्धा.

[२०] अमरावती :

१] श्रीमती नर्मदाबाई वानखेडे [अध्यक्षा]
ग्रामीण विकास संस्था, संचालक, महात्मा
गांधी आश्रमशाळा, सलोना,
तालुका– चिखलदरा, जिल्हा–अमरावती.

२] अध्यक्ष,
विदर्भ महारोगी सेवामंडळ, तपोवन,
मु.पो.ता. तपोवन,
जिल्हा– अमरावती.

३] अध्यक्ष,
अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळ,
"गुरुकुंज आश्रम,
अमरावती– ४४०६०१.

४] अध्यक्ष,
कस्तुरबा सर्वोदय मंडळ, मु.पो.मधान,
व्हाया– अचलपूर, तालुका–अचलपूर,
जिल्हा– अमरावती.

५] अध्यक्ष,
"जागर संस्था", मु.पो.शेंदुरजनघाट,
अमरावती, तालुका–जिल्हा–अमरावती.

६] महात्मा गांधी आश्रमशाळा,
सलोना, ता. मेळघाट, जि. अमरावती.

[२१] औरंगाबाद :

१] श्री. नाशिकराव तिरपुडे शिक्षण प्रसारक
मंडळ, वैजापूर, जि. औरंगाबाद

[२२] बुलढाणा :

१] शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बुलढाणा

[२३] <u>सातारा</u> :

१] रयत शिक्षण संस्था, सातारा

२] आर्य शिक्षण संस्था, सातारा

[२४] <u>कोल्हापूर</u> :

१] स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
ताराबाई पार्क, कोल्हापूर.

३. ३. वरील यादीवरून असे लक्षांत येते की, राज्याचे भौगोलिक विभागानुसार वर्गीकरण केले असतां पुढीलप्रमाणे चित्र स्पष्ट होते :-

| | विभाग | स्वयंसेवी संस्था |
|---|---|---|
| १. | मुंबई | ११ |
| २. | सह्याद्री विभाग | ९० |
| ३. | गोंडवन विभाग | ३० |
| ४. | इतर विभाग | १० |
| | एकूण- | १४१ |

३. ४. प्राप्त माहितीनुसार वरील १४१ सेवाभावी स्वयंसेवी संस्थांचे त्यांची उद्दिष्टे/कार्ये यानुसार वर्गीकरण केले असता पुढीलप्रमाणे आढळून येते-

| कार्यक्षेत्र | संख्या |
|---|---|
| १. शैक्षणिक कार्य करणाऱ्या एकूण स्वयंसेवी संस्था - | ७१ |
| २. वैद्यकीय कार्य करणाऱ्या एकूण स्वयंसेवी संस्था - | २९ |
| ३. सांस्कृतिक कार्य करणाऱ्या एकूण स्वयंसेवी संस्था - | २० |
| ४. उद्योग प्रशिक्षणाचे कार्य करणाऱ्या एकूण स्वयंसेवी संस्था. - | ३३ |
| ५. अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य करणाऱ्या एकूण स्वयंसेवी संस्था. - | ६ |
| ६. आदिवासी संघटनाचे कार्य करणाऱ्या एकूण स्वयंसेवी संस्था. - | ८ |
| ७. समाज [आदिवासी] जागृतीचे कार्य करणाऱ्या एकूण स्वयंसेवी संस्था. - | ३० |
| ८. इतर [अन्य विविध प्रकारचे] कार्य करणाऱ्या एकूण स्वयंसेवी संस्था. - | ६४ |

३.५ स्वयंसेवी संस्थांना आदिवासींचे विकास कार्यक्रमाचे कार्य करीत असतांना येणाऱ्या खर्चाप्रित्यर्थ जे "आर्थिक सहाय्य" लाभते त्याचा आढावा पुढील प्रमाणे सांगता येईल.

| कोणाकडून | संस्थांची संख्या |
|---|---|
| १. केंद्र शासन | ११ |
| २. महाराष्ट्र शासन | ४५ |
| ३. विदेशी/परकीय अर्थसहाय्य | १४ |
| ४. अन्य मार्गाने [देणग्या/वर्गणी/मदत इ.] | ६१ |

३.६ राज्य शासनाकडून स्वयंसेवी संस्थांना त्यांचे वार्षिक खर्चासाठी म्हणून ७५% ते १००% अनुदान देण्यांत येते. कांही स्वयंसेवी संस्थांना त्यांचे कार्यक्रमासाठी परकीय मदत मिळते असे आढळून आले आहे. अशा संस्थांची संख्या प्राप्त झालेल्या माहितीनुसार १४ आहे. त्या संस्थांना मिळणारी विदेशी मदत, तिचे स्वरूप, निश्चित मिळणारी रक्कम व या रक्कमेच्या विनियोगाचे दृष्टीकोनातून उद्देश इ. बाबींविषयी सविस्तर माहिती उपलब्ध नाही. वर उल्लेख केलेल्या १४ संस्थांची यादी पुढील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. ३.६.१.

विदेशी मदत मिळणाऱ्या स्वयंसेवी संस्था

| अ.नं. | जिल्हा | स्वयंसेवी संस्थेचे नांव व पत्ता. | विदेशी मदतीची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | ठाणे | "ग्राम मंगल", नूतन बालशिक्षण संघ, विकासवाडी, कोसबाड, ता. डहाणू, जि. ठाणे [४०१७०३] | माहिती अप्राप्त |
| २. | ठाणे | "ज्ञानमाता सदन सोसायटी" मु.पो. तलासरी व्हाया डहाणूरोड, जि. ठाणे [४०१६०६] | रु. ३,२०.०००/- |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| ३. | जळगांव | सातपुडा विकास मंडळ,<br>पाल, ता. रावेर, जि. जळगांव | माहिती अप्राप्त |
| ४. | पुणे | "ग्रामायन"<br>ग्रामीण विकास व संशोधन<br>संस्था, "दीपक"<br>७२०/१८, नवी पेठ,<br>पुणे-४११०३०. | माहिती अप्राप्त |
| ५. | पुणे | आदिवासी जाणिव जागृती केंद्र<br>३, शांतादुर्ग, ४१/५ कर्वे रोड,<br>पुणे-४११००४. | रु. ८०,०००/- |
| ६. | पुणे | महाराष्ट्र आरोग्य मंडळ,<br>हडपसर, पुणे-४११०२८. | माहिती अप्राप्त |
| ७. | पुणे | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद<br>६४, आनंद पार्क, औंध,<br>पुणे-४११००७. | रु. ५३,०००/- |
| ८. | पुणे | ग्रामीण शेती संस्था,<br>मु.पो. नारायण गांव,<br>ता. जुन्नर [४१०५०४] | माहिती अप्राप्त |
| ९. | पुणे | आरोग्य दक्षता मंडळ,<br>१९१३, सदाशिव पेठ,<br>पुणे-४११०३०. | रु. ४०,०००/- |
| १०. | नागपूर | समाजवादी महिला सभा,<br>शुभलक्ष्मी चितळे,<br>वि.हौ.सो. सिव्हिल लाईन्स,<br>नागपूर. | माहिती अप्राप्त |
| ११. | नांदेड | पुरोगामी मित्र मंडळ,<br>मु.पो.ता. मुखेड,<br>जि. नांदेड. | माहिती अप्राप्त |
| १२. | रायगड | अकॅडेमी ऑफ डेव्हलपमेंट<br>सायन्सेस, मु.पो. कशेळे,<br>ता. कर्जत, जि. रायगड. | माहिती अप्राप्त |
| १३. | रायगड | कुष्ठरोग निवारण समिती<br>शांतीवन, ता. पनवेल<br>[रायगड] | रु. १,००,०००/- |
| १४. | पुणे | आदिवासी सहज शिक्षण<br>परिवार, पुणे. | रु. १,१७,०००/- |

## प्रकरण– ४

## स्वयंसेवी संस्थांचे कार्य – निष्कर्ष व शिफारशी

४.१ राज्याच्या ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमामध्ये आदिवासी समाजामध्ये त्यांचे सर्वांगीण उन्नती आणि विकास होण्याचे दृष्टीने त्यासाठी आदिवासी क्षेत्रामध्ये सेवाभावी वृत्तीने कार्य करणा–या **स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य आणि सहयोग यांचे अनन्य साधारण महत्त्व** लक्षांत घेऊन त्यांना त्यांचे विकास कामाचे कार्यामध्ये उत्तेजन देण्याचे शासनाचे धोरण आहे.

४.२ आदिवासी समाज आणि त्यांचेसाठी कार्य करणा–या स्वयंसेवी संस्थांचे परस्पर संबंध जाणून त्यांना प्रोत्साहन देण्याची नितांत गरज आहे. राज्याच्या ग्रामीण आणि शहरी भागांतील विकास कार्यक्रमांचे यशस्वीरित्या नियोजन होण्याचे दृष्टीने स्वयंसेवी संस्थांची उत्तमरित्या मदत होऊ शकेल. सर्वसामान्य व्यक्तीच्या दृष्टीने नियोजनाचा कार्यक्रम हा एक अतिशय तांत्रिक आणि बहुविध स्वरूपाचा असल्यामुळे एकट्या शासकीय पातळीवर त्या कार्यक्रमाचे संनियंत्रण होणे अशक्यप्राय गोष्ट आहे आणि याशाठीच शासन आणि शासक [आदिवासी समाज] यांचेमधील विकास कार्यक्रमाचा एक महत्वपूर्ण दुवा म्हणून स्वयंसेवी संस्थांचे महत्त्व आहे. ज्या आदिवासी समाजातील बांधवांसाठी संस्था कार्य करीत आहेत त्या क्षेत्रांतील लोकांकरिता त्यांचा समाज आणि त्यांचे प्रश्न सोडविण्याचे दृष्टीने स्वयंसेवी संस्था एक तज्ञ म्हणून यशस्वीरीत्या भूमिका बजावत आहेत. या सर्व बाबींचा विचार करून स्वयंसेवी संस्थांचा विकास कार्यक्रमामध्ये अधिक व्यापक स्वरूपांत सहयोग होण्याचे दृष्टीने पुढील गोष्टींचा शिफारसपूर्वक विचार होणे आवश्यक आहे.

४.३ शिफारसी–

१. आदिवासी समाजामध्ये जनजागृती करण्याचे दृष्टीने आदिवासींचे सामाजिक, आर्थिक आणि अन्य प्रश्नांची जाण असणा–या स्वयंसेवी संस्थांना त्यांचे विकास कार्यक्रमामध्ये उत्तेजन देण्यांत यावे.

२. वर उल्लेख केलेल्या समाजसेवी संस्थांना राज्याचे ग्रामीण विकास कार्यक्रमामध्ये सहभागी करुन घेतांना ज्या संस्थांचा मूळ हेतू आदिवासी समाजाची पिळवणूक थांबविण्याचे दृष्टीने कार्य करण्याचा प्रामाणिक प्रयत्न असेल .अशा स्वयंसेवी संस्थांना प्राधान्य देण्यांत यावे. शासकीय पातळीवरील प्रयत्नांना पूरक ठरतील अशा रितीने स्वयंसेवी संस्थांचा व्यापक स्वरुपात उपयोग करुन घेण्यांत यावा.

३. शासन आणि आदिवासी समाज यांचेमधील परस्पर सहकार्य, सहयोग आणि सुसंवाद साधण्याचे दृष्टीने स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात यावी.

४. स्वयंसेवी संस्थांनी आदिवासी समाजामध्ये आतापर्यंत केलेल्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक कार्यामुळे एक फार मोठी परंपरा निर्माण केलेली आहे. या कामाची विस्तृत माहिती आणि मोल लक्षांत घेऊन त्यांच्यावर आदिवासी समाजाचे विकासाची नवीन जबाबदारी सोपविण्यांत यावी आणि त्याकरिता त्यांना पुरेशी भरीव आर्थिक मदत/अनुदान देण्यांत यावे.

५. स्वयंसेवी संस्थांचे पूर्वापार चालत असलेले आदिवासी विकासाचे काम जलदगतीने होण्याचे दृष्टीने त्यांना शासनाकडे उपलब्ध असलेल्या जमिनी देणे आणि त्यांना स्वत:ची इमारत बांधण्यासाठी भरीव स्वरुपाचे आर्थिक मदत देण्यांत यावी.

६. स्वयंसेवी संस्थांचे सामाजिक विकासाचे कार्य नियोजन आणि नियमबध्द होण्याचे दृष्टीने या संस्थांमध्ये त्यांचे आर्थिक बाबीसाठी लेखापाल आणि अन्य आवश्यक त्या कर्मचा-यांची पदे निर्माण करण्यांत यावीत.

७. आदिवासी समाजामध्ये जनजागृती आणि समाजोध्दाराचे भरीव काम करणा-या स्वयंसेवी संस्था आणि व्यक्ती यांचा सन्मान व प्रशस्तीपत्रक देऊन यथोचित गौरव करण्यांत यावा.

८. स्वयंसेवी संस्थांची राज्यपातळीवर संघटना उभारुन त्यांचे वार्षिक मेळावे घेण्यांत यावेत. या मेळाव्यांत चर्चासत्रे, व्याख्याने इ. आयोजित करण्यांत येऊन परस्परांचे कामाचे अनुभव/अडचणी यांची एकत्रित चर्चा घडवून आणण्यांत यावी.

९. स्वयंसेवी संस्थांना त्यांचे विकास कार्यक्रमांचे अंमलबजावणीस ये येणाऱ्या अडचणींची सोडवणूक शासन स्तरावर करण्यांत यावी.

१०. आदिवासी समाजाचे सर्वांगीण विकासाचे दृष्टीने शासन आणि शासक यांमधील एक दुवा या दृष्टीने सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांकडे पहाणे आवश्यक आहे.

४.४ केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सेवाभावी स्वयंसेवी संस्थांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्याचे दृष्टीने विविध समित्यांच्याद्वारे प्रयत्न करण्यासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये पुढील स्वरूपाच्या समित्यांची निर्मिती करण्यांत यावी.

१. <u>समिती क्र.१</u>- ही समिती राज्यांतील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पातळीवर स्थापन करण्यांत यावी. मा. जिल्हाधिकारी हे या समितीचे अध्यक्ष आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे या समितीचे सदस्य सचिव राहतील.

२. <u>समिती क्र.२</u> - ही समिती राज्यस्तरीय म्हणून निर्माण करण्यांत यावी मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मुंबई हे या समितीचे अध्यक्ष राहतील. आदिवासी क्षेत्रांत नावाजलेल्या आणि भरीव स्वरूपाचे कार्य करणाऱ्या व्यक्तींची सभासद म्हणून या समितीवर नियुक्ती करण्यांत यावी. गट विकास अधिकारी, पंचायत समिती हे तालुका/स्थानिक पातळीवर हे काम करु शकतील.

४.५. वर नमूद केलेल्या समित्यांची त्रैमासिक बैठक बोलावण्यांत यावी. या बैठकीमध्ये स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या कार्याचा आढावा, नियोजनबध्द पुढील काम आणि त्यांच्या अडचणी यांचा सांगोपांग विचार करुन त्यावर निर्णय घेण्यात यावा. स्वयंसेवी संस्थांना त्यांचे विकास कार्यक्रमासाठी ज्या पध्दतीची आर्थिक मदत/अनुदान मिळाले पाहिजे याही गोष्टींची सविस्तर चर्चा सदर समित्यांचे बैठकीमध्ये करण्यांत यावी. या सर्वांवर शासनाचे नियंत्रण असणे ही एक अत्यावश्यक गोष्ट आहे. वर नमूद केलेल्या समित्या या एकमेकांना पूरक

म्हणून काम करतील आणि त्यांचा एकत्रित अहवाल नियमितपणे केंद्र शासनास पाठविण्यांत यावा. याव्दारे केंद्र शासनास सदर अहवालावर योग्य तो निर्णय घेणे शक्य होईल.

आदिवासी समाजांतील स्वयंसेवी संस्थांचा सहयोग, सहकार्य यांचा योग्य तो उपयोग करून घेण्यांत आला तर राज्य/केंद्र शासनाने त्यांचे विकासासाठी आखण्यांत आलेल्या सर्वकष विकास कार्यक्रमांना योजलेले यश निश्चितपणे लाभेल यात कांही शंका नाही.

....

## प रि शि ष्ट

१ ते २

## परिशिष्ट– १
## स्वयंसेवी संघटनांचे स्थान आणि कार्य

सातव्या पंचवार्षिक योजनेतील, ग्रामीण विकाससंबंधीच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत, स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घ्यावे असे शासनाला वाटते. प्रथमच अशात–हेचे अधिकृत धोरण शासनाने जाहीर केले आहे. **परीवर्तनाच्या प्रक्रीयेत स्वयंसेवी संघटनांचे कार्य आणि स्थान याची पुरेशी** दखल आजपर्यंत घेतली गेली नाही अशी कबूली योजनेच्या मसुद्यात दिलेली आहे ही गोष्ट स्वागतार्ह आहे. स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घ्यायचे म्हणजे नेमके काय करावयाचे हे मात्र मोघमच राहिले आहे. पाच वर्षांच्या काळात रु. १००–१५० कोटी, अशा सहकार्याने करावयाच्या कार्यासाठी, खर्ची पडतील असे नमूद केले आहे. एखाद्या ठिकाणी विशिष्ट योजना राबविण्याची संपूर्ण जबाबदारी स्वयंसेवी संस्थेवर टाकली जाईल असे यावरुन दिसत नाही. स्थानिक पातळीवरील शासनयंत्रणा अशा संस्थांचे सहकार्य घेऊ शकतील. एवढाच अर्थ या लिखाणावरुन निघतो.

या संदर्भात स्वयंसेवी संस्थांचे कार्य, त्यांच्या भूमिका, त्यांची कार्यपध्दती, त्यांची कुवत या सर्वच गोष्टींबाबत अधिक स्पष्टपणे बोलणे आवश्यक ठरते. शासन सहकार्य मागते म्हणून हुरळून जाण्याचे कारण नाही, तसेच विनाकारण ताठर भूमिका घेण्याचेही कारण नाही. आपल्या चालू असलेल्या कार्यास मुद्दाम निराळे वळण देण्याचीही गरज नाही. पण सहकार्याची संधी मिळत असल्यास या संधीचा आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, फायदा घेण्यासही हरकत नाही.

आजच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीच्या संदर्भात, स्वयंसेवी संघटनांचे कार्य प्रामुख्याने तीन प्रकारचे आहे.

१] दुर्बल घटकांचे संघटन, त्यांचे प्रबोधन, शक्य तिथे आर्थिक उपक्रमांचा त्यासाठी अवलंब करणे, त्यातून गावपातळीवर व वरच्या पातळीवर त्यांचा सामाजिक, राजकीय जीवनात सहभाग वाढवून, सामाजिक परिवर्तनाला गती देणे.

२] आपल्या समाजातील गुंतागुंतीचे प्रश्न हाती घेणे, त्यावर विचार करून प्रयोग करणे, प्रयोगांतून निष्कर्ष काढता आले तर त्याचा प्रसार करणे, शासनाच्या योजनांत त्यांचा अंतर्भाव करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे.

३] सूक्ष्म पातळीवरील प्रयोग, (Micro-level) नियोजन आणि स्थूल पातळीवरील (Macro-level) नियोजन यांची सांगड घालण्यासाठी प्रयोगांतून विचार मांडणे, त्यातून देशाच्या आर्थिक धोरणाला आणि नियोजनाला परिपूर्णता यावी या दृष्टीने विचारवंतांना प्रवृत्त करणे. आणि जनमत तयार करणे.

ही तीन प्रमुख कार्ये झाली. याशिवाय इतरही कार्ये सांगता येतील. वरील प्रत्येक कार्याचे उदाहरण देऊन स्पष्टीकरण देण्याचा खाली प्रयत्न केला आहे.

१. लोकशाहीच्या मार्गाने समतेवर आधारित समाजरचना निर्माण करण्याचे उद्दिष्ट आपण सर्वांनी मान्य केले आहे. याची जबाबदारी शासनावर आणि राजकीय पक्षांवर अधिक पडते. पुरोगामी योजना आणि धोरणे आखून ती राबविणे हे शासनाचे काम. हे कार्य योग्यप्रकारे पार पाडले जावे यासाठी सतत जागरूकपणे शासनावर अंकुश ठेवणे, धोरणाची परखड चिकित्सा करणे आणि लोकमत संघटित करणे हे राजकीय पक्षांचे काम. या दोनही घटकांच्या कामात उणिवा दिसून आल्या. त्यामुळे अनेक तरूणांनी, गटागटाने प्रत्यक्ष कामाला सुरवात केली. त्यांचे प्रमुख उद्दिष्ट गरीब, दलित, शोषित समाजाला संघटित करणे, त्यांचे प्रबोधन करणे आणि त्यांच्या आशा-आकांक्षांना वाट करून देणे हे आहे. त्यांच्या संघटना बांधण्यासाठी आर्थिक उपक्रमांचा ते वापर करतात. शासनाच्या योजनांचाही त्यांना उपयोग होतो. म्हणून त्यांचाही ते वापर करतात. या त्यांच्या कार्यामुळे आज ठिकठिकाणी दुर्बल घटक संघटित झालेला दिसतो. स्थानिक पातळीवर आपले गा-हाणे ते आग्रहाने मांडताना दिसतात. लोकशाहीच्या प्रक्रियेत त्यांचा सहभाग होऊ लागल्याने साहजिकच आपल्या देशातील लोकशाहीला नवीन आणि इष्ट वळण

लागत आहे. या लोकांच्या गरजांची अडचणींची, दखल शासनाला, विचारवंतांना घ्यावी लागत आहे. शासनाच्या योजना, या वर्गाच्या संघटित दबावाखेरीज अंमलात आणल्या जात नाहीत असा सर्वत्र अनुभव येतो. भूमिहीन मजूर, आदिवासी, वेठबिगार, खेडेगावातील कारागीर, स्त्रिया इ. गरीब जनतेसाठी तयार केलेले उपक्रम त्यांच्या संघटनेखेरीज मार्गी लागत नाहीत. म्हणून या वर्गाचे संघटन आणि प्रबोधन करणे हे स्वयंसेवी संघटनांचे एक प्रमुख कार्य राहते. पुढील काळातही राहील.

याची अनेक उदाहरणे देता येतील. महाराष्ट्रात दुष्काळ पडतो. अशावेळी शासन सार्वजनिक कामे काढून रोजगार उपलब्ध करते. स्वयंसेवी संघटनांचे कार्य अशा परिस्थितीत या योजनांचा फायदा घेण्यासाठी लोकांना तयार करणे हे आहेच. परंतु हा केवळ प्रारंभ आहे. पुढची पायरी अशी की, दुष्काळ का पडतो, त्याचे स्वरूप काय, त्यावर कायम स्वरूपाचे उपाय कोणते, त्या दृष्टीने राज्य पातळीवरील नियोजनात काय बदल हवेत, हे बदल घडवून आणण्यासाठी लोकमत कसे जागृत करावयाचे असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित करून त्यावर लोकांनी बोलावयास हवे. हे काम स्वयंसेवी कार्यकर्त्यांचे आहे. मानवतावादी दृष्टीकोनातून तातडीने काम सुरु करणे, शासनाला हातभार लावणे एवढयावरच त्यांचे काम संपत नाही. साहजिकच या प्रबोधनाच्या कामातून मतभेद, संघर्ष निर्माण होण्याचा संभव असतो. पण तो टाळता येणार नाही.

इतर क्षेत्रांतील दुर्बल घटकांच्या संघटनांचे आणि प्रबोधनाचे महत्व सर्वश्रुत आहे. चांगले कायदे आणि योजना अस्तित्वात असून देखिल त्यांचा लाभ लोकांना मिळत नाही, कारण या लाभधारकांना संघटित केलेले नसते. रोजगार हमी योजना मोठ्या प्रमाणावर राबविली गेली याचे एक कारण कष्टक-यांची संघटना बांधण्याचे कार्य स्वयंसेवी संघटनांनी केले म्हणून. हमालपंचायत झगडा देऊन उभी राहिली, म्हणून माथाडी योजना शासनाला लागू करणे भाग पडले. वेठबिगार हुडकून काढून त्यांना संघटित केले म्हणून वेठबिगार मुक्त झाले आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी योजना राबविल्या गेल्या अशी अनेक उदाहरणे देता येतील. हे स्वयंसेवी कार्यकर्त्यांचे कार्य लोकशाहीची प्रक्रिया सुरु

करण्याच्या दृष्टीने मौलिक आहे. या सर्व प्रकारच्या कामात, कधी शासनाशी तर कधी व्यापारी–सावकारांशी, तर कधी राजकीय पक्षांच्या स्थानिक पुढा–यांशी संघर्ष करावा लागलेला आहे. येथून पुढेही अशा तऱ्हेचे संघर्ष अटळ दिसतात.

२. स्वयंसेवी संघटनांचे दुसरे महत्वाचे कार्यक्षेत्र अनेक महत्वाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयोग करून मार्ग शोधणे हे आहे. आपल्यापुढे फार गुंतागुंतीचे प्रश्न आहेत. आर्थिक क्षेत्रात, तसेच सामाजिक राजकीय क्षेत्रात या समस्यांचा विचार केवळ तात्विक पातळीवर करून भागणार नाही. प्रत्यक्ष प्रयोग करावे लागतात अशा तऱ्हेचे प्रयोग शासनाला लाल फितीच्या बंधनात राहून करता येतीलच असे नाही. म्हणून स्वयंसेवी संघटनांचे महत्व आहे. याचे उत्तम उदाहरण पाणी पंचायतचे देता येईल. दुष्काळी भागात गावपातळीवर पाणी साठविणे आणि त्याचे समप्रमाणात वाटप करणे हे या प्रयोगाचे उद्दिष्ट आहे. या प्रयोगातून असे सिध्द होते की, अशा तऱ्हेची कामे हाती घेतल्यास दुष्काळी परिस्थितीवर मोठ्या प्रमाणावर मात करता येते. पाण्याचा लाभ जास्तीत जास्त प्रमाणात शेतक–यांना आणि शेतजमिनीला देता येतो आणि त्यामुळे बहुसंख्य शेतक–यांचे दारिद्र्य दूर करण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होते. तसेच "तळापासून नियोजन" या कल्पनेला आशय प्राप्त करून देता येतो. या प्रयोगातून निघणारे निष्कर्ष व्यापक प्रमाणावर लागू करता येतील. शासनाने त्याची दखल घेऊन त्यानुसार आपल्या धोरणात बदल करावयास हवेत.

या संदर्भात "ग्रामायन" च्या कार्याचाही उल्लेख करता येईल. करोडो रुपयांची गुंतवणूक करून शासनाने शेतीला पाणी पुरवठ्याच्या सहकारी उपसा योजना स्थापन केल्या. ही गुंतवणूक सर्वात महत्वाची. परंतु हया योजना फार काळ चालल्या नाहीत. त्यास तांत्रिक, आर्थिक, सामाजिक कारणे आहेत. ही कारणे शोधून उपाय निश्चित करणे, संबंधित लाभधारकांचे संघटन करून त्यांना व्यवस्थापनाचे धडे देणे, पाणी वाटपाची व्यवस्था घालून देणे, लोकशाही पध्दतीने ही

व्यवस्था राबविणे, तंटेबखेडे मिटविणे, तांत्रिक दुरुस्तीसाठी नवीन धर्तीवर व्यवस्था निर्माण करणे इत्यादी कामे करण्याचा "ग्रामायन" प्रयत्न करते. त्याचबरोबर अशा योजना अधिक लाभदायक होण्यासाठी उत्पादक वस्तूंचा( Inputs )पुरवठा, शेतमालाची विक्री, सहकारी पध्दतीवर काही सभागतीची कामे इत्यादी गोष्टींचाही विचार होतो आणि त्या दृष्टीने लोकशिक्षणाचे काम केले जाते. हे सर्व कार्य महत्वाचे आहे. ते केले नाहीतर करोडो रूपयांची गुंतवणूक पाण्यात जाते हा अनुभव आहे.

म्हैसाळ प्रकल्पाचा विशेष उल्लेख करावा लागेल. खेड्यांतील अल्पसंख्यांक दलित जातींचा प्रश्न सोडविण्याचा एक मार्ग या प्रयोगातून दिसतो. गावकीच्या जोखडातून मुक्त करून आर्थिकदृष्ट्या या वर्गाला स्वावलंबी करणे, संयुक्त शेतीसारख्या आर्थिक संस्था कार्यक्षम पध्दतीने चालविण्यास तयार करून त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि इतर जमातीतील दुर्बलांना मदतीचा हात देऊन सर्व दुर्बल घटकांची एक फळी तयार करणे असे या प्रयोगाचे सार सांगता येईल. हे कामही नावापुरते मर्यादित राहण्याचे कारण नाही. त्यातून योग्य ते मार्गदर्शन घेऊन खेडोपाडी त्याचा प्रसार करता आला तर एका सामाजिक प्रश्नावर महत्वाचा तोडगा निघू शकतो.

या सर्व उदाहरणांवरून असे दिसून येते की, स्वयंसेवी संघटनांचे हे कार्य मौलिक असून, त्यापासून शासनाने, विचारवंतांनी आणि समाजाने योग्य ते धडे शिकणे आवश्यक आहे.

३. गावपातळीवरील किंवा एखाद्या गटाच्या पातळीवरील कार्य यशस्वी होण्यासाठी समाजातील वातावरण बदलणे आवश्यक असते. तसेच शासनाचे धोरण, कायदेकानू, नियम, नियोजन यातही योग्य ते फेरबदल करावे लागतात. उदाहरणार्थ, पाणीपंचायत, ग्रामायन, म्हैसाळ यांचे कार्य यशस्वी होण्यासाठी शासनाला अनुकूल धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. हे धोरण अनुकूल कसे करावे याचे मार्गदर्शन या प्रयोगातून मिळते. आयकर, वीजपुरवठा आणि वीजबील आकारणी,

दलितांच्या सामुहिक उपक्रमास प्रोत्साहन आणि सहाय्य, मोठया यंत्रासामग्रीच्या देखभालीची व्यवस्था, उत्पादक वस्तुंचा पुरवठा, मालविक्रीसाठी वाहतूक आणि योग्य किंमती, माल पाठविण्याच्या सोयी अशा एक ना अनेक क्षेत्रात शासनाने आपले धोरण आणि आपल्या योजना तपासून पाहणे आवश्यक आहे. स्वयंसेवी संस्थांच्या अनुभवातून या दृष्टीने काही प्रमाणात मार्गदर्शन होऊ शकेल. शासनाने या प्रयोगातून निघणाऱ्या निष्कर्षांकडे दुर्लक्ष केल्यास त्यात समाजाची हानी आहे. स्वयंसेवी संघटनांनी आवश्यक असल्यास लोकमताचे दडपण निर्माण करणे ही अपरिहार्य ठरते.

वरील त्रोटक विवेचन करण्याचे प्रयोजन एवढयासाठीच की, आज शासनास नियोजनाच्या अंमलबजावणीत स्वयंसेवी संघटनेचे सहकार्य घ्यावे असे वाटते. विशेषत: दारिद्रय निर्मूलनासाठी ज्या योजना आहेत, त्या कामात त्यांना सहकार्य आवश्यक वाटते. एकात्म ग्रामीण विकास योजना [आय. आर. डी. पी. ] मोठया प्रमाणावर अपयशी होत आहे. शासनाने या संदर्भात एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी की, केवळ काही स्वयंसेवी संघटनांचे सहकार्य घेतल्याने हा प्रश्न सुटणार नाही. स्वयंसेवी संघटनांनी जरुर सहकार्य द्यावे. परंतु आपली भूमिका, कार्यपध्दती स्पष्ट करावी. दारिद्रय रेषेखालील लोकांना संघटित करणे, त्यासाठी योजनेतील आर्थिक उपक्रमांचा उपयोग करणे आणि हे कार्य करीत असतांना त्यास पूरक धोरणाचा आग्रह धरणे ही स्वयंसेवी संघटनांची भूमिका अधिक जागरुकपणे आणि आग्रहाने रेटली पाहिजे.

स्वयंसेवी संघटनांच्या सहकार्याची मागणी करताना या संघटनांचे लोकशाही प्रक्रियेतील महत्वपूर्ण स्थान शासनाने लक्षात घ्यावे. त्यांचा मान राखावा. स्वयंसेवी संघटनांनी देखील आज शासनाची मान्यता मिळते म्हणून संतुष्ट होऊ नये. आपले उद्दिष्ट लोकसंघटन, लोकजागृती आणि त्यामार्फत आर्थिक, सामाजिक परिवर्तन हे आहे. हे उद्दिष्ट सर्वांचेच आहे. म्हणून जसे सहकार्य शक्य आहे आणि आवश्यक आहे तसे मतभेद आणि संघर्ष हेही अटळ आहेत. काही हितसंबंधांना

धक्का द्यावा लागेल. शासनावरही दडपण आणावे लागेल. लोकशाहीच्या प्रक्रियेचा हा एक अपरिहार्य भाग आहे. याची जाणीव आपणा सर्वांनाच असणे आवश्यक आहे.

स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचे महत्व समजावून घेत असतांना, त्यांची आजची परिस्थिती काय आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. गरजेच्या मानाने यांची संख्या खूपच कमी आहे. ती कशी वाढेल आणि त्यांच्या कार्यात तरूण वर्ग कसा येऊ शकेल याकडे सर्वप्रथम लक्ष द्यावयास हवे. अशा कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण ही तितकीच महत्वाची बाब. या बाबतीत काही प्रयोग चालू आहेत. ते अधिक समृध्द करणे आवश्यक आहे. स्वयंसेवी संस्थांची आर्थिक स्थिती बिकट आहे. नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही. आज परदेशी संस्थांकडून अर्थसहाय्य मिळते म्हणून ब-याच संस्था तगून आहेत. परंतु हे सहाय्य अल्पकाळच टिकणारे आहे आणि काही विशिष्ट उपक्रमांपुरतेच मर्यादित आहे. अशा सहाय्याचे काही अनिष्ट परिणामही आहेत. सर्वसामान्य नागरिकांकडून वर्गणी, देणग्या यामार्फत निधी उभा करण्याचे प्रयत्न फारसे यशस्वी होत नाहीत असा अनुभव आहे. ज्या लोकांत काम करावयाचे, त्यांच्याकडूनच सहाय्य मिळविणे हा एक मार्ग आहे पण तोही बराच अपुरा पडतो. अशा परिस्थितीत कार्यकर्त्यांना सातत्याने काम करणे कठीण जाते. शासनाने ही परिस्थिती लक्षात घेऊन, सहकार्य मागताना आणि स्वीकारताना, या सहकार्यातून स्वयंसेवी संस्थांना आर्थिक स्थैर्य कसे लाभेल याचा विचार करणे आवश्यक आहे. केवळ जबाबदारी टाकून किंवा सहकार्याची अपेक्षा करून उपयोग होणार नाही.

स्वयंसेवी संस्थांचा अंतर्गत कारभार, व्यवस्थापन, कार्यकर्त्यांची कुवत, नितिमत्ता आणि त्यांची जाण या बाबतीतही परखड आत्मपरीक्षण आवश्यक वाटते. शासनावर टिकास्त्र सोडत असताना, आपण आपल्या संस्थेच्या अंतर्गत कारभाराविषयीही जागरूकता दाखवून, सुधारणा करीत राहिले पाहिजे. सामाजिक कार्यकर्त्यांचे कौतुक कानावर येते, तसेच त्यांच्याविषयी टिकाही कानावर येते. प्रामुख्याने टीका असते ती सामाजिक कार्यकर्त्यांच्या नितिमत्तेवर

कामाच्या पध्दतीवर आणि वेशिस्तीवर प्रबोधन, संघटन कार्यामध्ये विधायक कार्याची होत असलेली उपेक्षा याबाबतही नाराजी दिसून येते. ही सर्व प्रकारची टीका सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि त्यांच्या संघटनांनी मोकळ्या मनाने समजावून घेतली पाहिजे आणि आपल्या वर्तनात, कार्यपध्दतीत योग्य त्या सुधारणा केल्या पाहिजेत. तरच विश्वासर्हता वाढेल आणि स्वयंसेवी संस्थांचे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल.

स्वयंसेवी संस्था अलग अलगपणे काम करतात. बहुधा एकमेकांना एकमेकांच्या कार्याचीही माहिती नसते. विचारांची, अनुभवांची देवाणघेवाण क्वचितच होते. सर्वांनी मिळून एखादे काम हाती घेणे दूरच । या एकांड्या शिलेदारीला निरोप देऊन काही किमान प्रमाणात तरी संस्थांनी एका व्यासपीठावर येऊन, एकमेकांच्या कामात सुसूत्रता आणावयाचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. स्वत:चे वैशिष्टय आणि अस्मिता अबाधित ठेवून एकत्र येणे अवघड नाही. एकमेकांपासून शिकण्यासारखे खूप आहे, तसेच एकमेकांना आधार देणे आवश्यक आहे. विशेषत: स्वयंसेवी संघटनांना विकासप्रक्रियेत विशेष कामगिरी बजावयाची असेल आणि शासनाबरोबर सहकार्याचे नवे पर्व सुरु करावयाचे असेल, तर काही किमान प्रमाणात एक फळी असणे आवश्यक आहे. स्वयंसेवी संघटनांनी या दिशेने त्वरित पावले टाकावीत.

.....

श्री. व. द. देशपांडे,
अध्यक्ष,
ग्रामायन.

VOLUNTARY AGENCIES IN TRIBAL AREAS : THEIR ROLES AND FUNCTIONAL TYPES

- Dr. G.M.Gare,
Director,
Tribal Research and
Training Institute,
Maharashtra State,Pune.

1.1 The need for and the necessity of voluntary agencies to improve the socio-economic standard of life in the country cannot be over emphasised. Voluntary agencies are those which are engaged in the work of social welfare and in community organisation. Through socio-economic programmes and social action, they enable people to exercise the power and the strength of the people themselves possess. They are catalysts for a constructive work, breaking down the barriers created by the economic and social problems caused by an agro-industrial society, through social disparities, vested interests and institutionalised forms of oppressions. Their task is to develop in individuals and in communities positive critical attitude and healthy human relationships based on justice and liberty in the social, economic and political structures of society. In short, voluntary agencies are engaged in the developmental task of the total man in-community with a special concern for the weaker sections.

1.2 Though voluntary organisations should have a clear ideology in favour of the weaker sections and a definite direction for comprehensive development of man in-community, yet no single pattern of action can be suggested for all the voluntary organisations as they are working in different

parts and have to meet the needs arising from different situations in each communities exist. Their concrete action and its methodology will, moreover, depend on certain other priorities, such as, the needs of the people, the extent of people's participation, resources, personnel etc. But this much can certainly be said that those organisations should have as their main goal the establishment of a just social order and that this cannot be done, merely through economic projects or activities alone, unless the aspect of social action is the main operative principle.

Developmental Areas for Voluntary Agencies

1.3 Economic developmental work is a continuous process. It can be measured at a given point of time mainly in quantitative and measurable terms, such as increase in per capital income, the number and the magnitudes of projects and activities etc. Along with this, qualitative element, that is, social developmental component, should also form an integral part of comprehensive developmental work which brings about a change in the attitudes and the practices of the people. In order that both the quantitative and the qualitative aspects are present in comprehensive development, the voluntary agencies should keep in view that a given community is the people of the past, of the present and of the future with attitude, taboos, strength and weaknesses peculiar to it. Concretely, the voluntary agencies have to work, by and large, for integrated community development of the rural areas, where a majority of the economically and socially

deprived classes live. For such comprehensive development, voluntary agencies have to work on three simultaneous spheres of activities, namely, economic programme, health-hygiene-nutrition programme and non-formal education.

1.4 Development is the development of the whole man in-community. Building up the human person in community and bring him to the full fledging of his capacities in a free is its goal. People's organisation at grass roots level should be built and strengthened. The struggle for socio-economic development is a struggle for survival of the weakest. They should be trained to fight their own battles in order to ensure the quality of their life. Such development work cannot be handled by the Government or by a single Charismatic leader alone. That is why we require dedicated, sincere and competent voluntary agencies for a comprehensive development of the whole man in community.

1.5 In this paper attempt has been made to present a brief record of the activities of the voluntary agencies in the State of Maharashtra and their role in Tribal Development. With a view to uplift the tribal people, voluntary social organisations managed by tribal and non-tribal people, are working in tribal areas of this State since last 50 years. The activities and objectives of the voluntary agencies can be summed up as under :-

(1) To manage the hostels for backward classes on grant-in-aid basis.

(2) To run Ashram Schools for the Scheduled Tribes on grant-in-aid basis.

(3) To manage the Balwadis on grant-in-aid basis and to render other services to the tribal people.

(4) To create social awakening and to build organisations among the tribal people through various activities.

(5) To assist the tribal people to get the possession of land, which have been alienated earlier to the non-tribals.

(6) To provide medical and health services to the tribals living in hilly areas.

(7) To stop their economic and social exploitation.

1.6 On the basis of objectives and activities the voluntary organisations functioning in tribal areas of Maharashtra State can be classified into three main categories :-

(1) Voluntary Organisations engaged only in educational activities, run the Aided Hostels, Aided Ashram Schools and Balwadi, Secondary Schools and Colleges in the State. There are about 15,000 Aided Hostels, about 400 Ashram Schools and number of Secondary Schools and Colleges run by the Voluntary organisations. Out of them, about 5000 voluntary organisations are functioning in the tribal areas.

(2) Voluntary Organisations engaged in providing educational, medical, agricultural and social services are assisted with the programme of Adult Education, Special

Nutrition Programme, Medical care and Health Services, Agricultural education and training etc. of them, few leading voluntary organisations functioning in tribal areas can be named. The list of such organisations is given in Appendix-I.

(3) Voluntary Organisations mainly engaged in awakening and organising the tribals through various activities are very few. However, their role is very important in the developing society. Their primary aim is to stop exploitation of the tribals on account of land, labour, wages and exploitative practices which prevail in tribal society. Some Voluntary Organisations like Bhumisena, Shramik Sanghatana, Adiwasi Janiv-Jagriti Kendra, Adiwasi Sahitya Parishad, Adiwasi Yuvak Sanghatana, Maharashtra Pradesh Adiwasi Seva Samiti etc. are functioning in tribal areas with specific objectives. These organisations have been initially organised with the assistance of the leftists and socialists groups. However, at present the local Adiwasi run these organisations. Their main activities can be clsssified as under :-

(1) To free the bonded Adiwasi labourers from the clutches of the landlords.

(2) To assist the tribal people to get the possession of land which have been alienated earlier to the non-tribals.

(3) To stop exploitation in grass cutting and purchase of minor forest produce.

(4) To propagate the idea of prohibition for the development of the tribal people.

(5) To organise the tribal women for their upliftment.

(6) To stop exploitation of agricultural labourers and Saldars working with the non-tribal landlords.

(7) To fight for fair wages on Employment Guarantee Scheme, forest produce and other works in the tribal areas.

(8) To work for making social awakening and organising tribal people to fight against the exploitation.

These organisations through their activities have created leadership among the tribals. Under these organisations the tribal people organised Satyagraha at various places against the injustice caused to them. At some places there were clashes in tribal workers and the landlords of the area. This was mainly due to their organised movements, political awakening which were created in some areas. The tribal women had broken the pots of liquor at various places and thus tried to create social awakening against the traditional evil of drinking liquor.

Problems of the Voluntary Agencies

1.7 It has been observed that in spite of the spirit of dedication and sacrifice with which the workers, of these organisations are working they are facing a number of problems in these remote and hilly areas. A few of these problems can be summarised as under :-

(1) Difficulty in getting donations for their activities.

(2) Difficulty in getting trained and devoted social workers to manage the organisations and its activities.

(3) Training of personnel managing the activities, such as, Ashram Schools, Hostels, Balwadis etc.

(4) Lack of financial assistance from Government.

(5) Lack of coordination of activities of various organisations.

The Voluntary Organisations find it difficult to manage the affairs of hostels, Ashram Schools on 90% grant-in-aid basis. Their demand is 100% grant on approved items of expenditure to run a hostel or Ashram School with efficient services. They cannot get donations from the tribal people, whose economic condition by and large is far from satisfaction. In the pre-Independence period, the Bombay State was considered as a Deo-hive of the Voluntary Organisations, rendering valuable selfless services to the weaker sections in particular and other people in general. But at present it has been noticed that there is mushroom growth of local area based Voluntary Organisations, who mostly neither have sound financial base nor a team of dedicated social workers. As a result of it, they cannot deliver effectively, the services needed for the activities. It is also observed that some of the agencies have taken the activities with business motive rather than the spirit of dedication and service to the weaker sections.

....3/-

Role of Voluntary Agencies in Tribal Development

1.8 The overall development of the tribal people is not possible only by the governmental ageicies. The people's participation is therefore very necessary in planning and effective implementation of the tribal development programmes. Such of the Voluntary Agencies, who have a good record of services need encouragement and a few of them who are not providing the services as per the rules, will have to be weeded out, so that the work of voluntary agencies is projected properly in the field of tribal development. The voluntary agencies can ventilate the grievances of these people and get redressed through the Governmental agencies. They can play an important role of bridging the gap between the people and the Government. It is through their selfless services, character and dedication that they can impress the tribal people and the Government.

It is also necessary that the voluntary agencies working in the field of tribal development have a meeting platform, once in a year to share each other's experiences in the field of tribal welfare. The training of personnel working in Balwadis, Hostels and Ashram Schools will also improve their teaching abilities which ultimately may result in good results in these fields. The Training Institutes can associate with the training programmes of these personnel.

The pace of tribal development will have to be

accelerated with the effective participation of good voluntary agencies. Continuous dialogues between the officials and non-officials may result in bringing them clear to share each others views in the field of tribal welfare. Active participation of good voluntary agencies is necessary for the speedy uplift of tribal people in Maharashtra State.

.....